**दिनांक ०५/०३/२०२० कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीच्या २९ व्या बैठकीची टिपणी**
**मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई.**

**१.मागिल बैठकीचा आढावा.**

| अ.क्र | विषय | झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| * | **पाणथळ क्षेत्राचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मा. अध्यक्षांनी प्राधान्याने सर्व सदस्यांना दिलेल्या सूचना** | • मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पाणथळ जागा ही Wetland Atlast नुसार जी जागा पाणथळ आहे त्याचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.<br>• पाणथळ क्षेत्र हे ज्या कोणाच्या ताब्यात आहे त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हाधिकारी कार्यालयातील Planning Authority ची राहील.<br>• तसेच संबंधीत जिल्हयांच्या Planning Authority ने त्यांच्या क्षेत्रातील पाणथळ जागा तपासून त्यांची यादी तयार करुन सदर ठिकाणी होणारा भराव व अनधिकृत बांधकाम होणार नाही यासाठी आवश्यक पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने सदर ठिकाणी फीरते पथक लावून कांदळवनाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने दक्षता घ्यावी अशा सूचना देखील समितीच्या अध्यक्षांनी दिल्या.<br>• तसेच जिल्हाधिकारी यांनी सर्व महानगरपालिकेला ज्या ठिकाणी पाणथळ क्षेत्र आहे तेथे कोणत्याही प्रकारे अनधिकृत बांधकाम आणि भराव केलेला नाही असे सांगितले.<br>• तसेच अनधिकृत बांधकाम व भराव या संबंधी FIR दाखल करुन संबंधीत SDO मार्फत चार्जशीट न्यायालयात गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | **संबंधीत सर्व जिल्हाधिकारी** |
| * | **नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतीबाबत.** | • समितीच्या अध्यक्षांनी पाणथळ तक्रार निवारण समितीमध्ये प्रत्येक वेळी वेगवेगळे अधिकारी उपस्थित राहतात परिणामी तक्रारी निवारण होत नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सर्व सदस्यांना या समितीबाबत गांभीर्यपूर्वक विचार करुन योग्य नोडल अधिकारीच दरमहा होणाऱ्या बैठकीमध्ये उपस्थित राहतील याची दक्षता घेण्याच्या सूचना सदस्यांना दिल्या आहेत. | **सर्व जिल्हाधिकारी,**<br>**सर्व महानगरपालिका,**<br>**सिडको** |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाशकरुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी. | • या बाबत मंडळ अधिकारी यांच्यामार्फत सदर FIR दाखल करण्याबाबत कार्यवाही प्रलंबित आहे. मा. आयुक्त Environment Protection Act नुसार SDO तसेच MPCB च्या अधिकाऱ्यांना FIR आणि चार्जशिट दाखल करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, पालघर यांच्या प्रतिनिधींना दिल्या होत्या.<br>• या बाबत दि.१० फेब्रुवारी २०२० पर्यंत SDO मार्फत चार्च शिट दाखल करून त्याची प्रत समितीकडे सादर करावी असे निदेश मा. अध्यक्षांनी दिले. | तहसिलदार वसई<br>(जिल्हाधिकारी पालघर)<br>**अहवाल अप्राप्त** |
| २ | श्री. धिरज परब: - भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड यांच्याकडून या तक्रारीबाबतचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत असे सदस्य सचिवांनी सांगितले होते.<br>• तसेच या तक्रारी सदंर्भात MCZMA यांच्यामार्फत सदर जागेवर काम करण्याच्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत परंतु या बाबत कोण्यात्याही प्रकारची कागदपत्रे समितीपुढे अद्याप सादर केलेली नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने याबाबत लेखी स्वरुपात कोणत्या परवानग्या घेतल्या याची तपासणी करण्याच्या सूचना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या व सदर ठिकाणी विनापरवानगी काम केले असल्यास मेरीटाईम बोर्ड यांच्या विरुध्द नोटीस काढण्याच्या सूचना अध्यक्षांनी दिल्या.<br>अ. तसेच मा. अध्यक्षांनी MCZMA यांच्या प्रतिनिधींना पुढील बैठकीत उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. | तहसिलदार ठाणे<br>(जिल्हाधिकारी ठाणे)<br>आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि<br>तहसिलदार ठाणे<br>**अहवाल अप्राप्त** |
| ३ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री. स्टॅलीन डी - दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारी संदर्भात SDO मार्फत कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे असे जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले व तसेच सदरची जागा ही सॉल्ट विभागाची असल्यामुळे या तक्रारीबाबत सॉल्ट पॅन आयुक्त यांना कळविण्यात आले आहे तसेच सदर ठिकाणी असलेला नाल्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी सॉल्ट पॅन विभागाने परवानगी दिलेली नाही असे वन विभागाने सांगितले.<br>• परंतु या बाबत सॉल्ट विभागाचे कोणतेही नोडल अधिकारी बैठकीस उपसिथत राहत नसल्याने उप आयुक्त, सॉल्ट पॅन यांच्या विरुध्द नोटीस देण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले व १० दिवसाच्या आत कार्यवाही करून अहवाल सादर करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई शहर<br><br>**अहवाल अप्राप्त** |
| ५ | श्री. सुनिल अगरवाल व<br><br>श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br><br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal | • पाणजे येथे कांदळवन असल्यामुळे सदर ठिकाणी असलेले कांदळवनाचे नुकसान होऊ नये यासाठी पाण्याचे प्रवाह खुले ठेवण्याच्या सूचना समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत.<br>• सदरची जागा ही २००४ साली रिलायन्स या संस्थेला हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• पाणजे वेटलॅन्ड हे क्षेत्र CRZ मध्ये येत असून CRZ चे उल्लंघन झाल्यामुळे सदरची तक्रार पर्यावरण विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या सूचना समितीने दिल्या.<br>• तसेच भेणखळ बाबत सिडको Planning Authority असल्याने सदरची जागा Restore करण्याची जबाबदारी राहील व सिडको यांनी पर्यावरण विभागाच्या मदतीने सदर जागेबाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे समितीने निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको<br><br>**अहवाल अप्राप्त** |
| ६ | **श्री. समिर सुभाष वर्तक आणि मॅकेन्झी डांबरे दि. २२/०२/२१९** भुईगाव येथील पाणथळ जागेवर तिवरांची कत्तल होऊन अतिक्रमणाबाबत शासनाच्या उदासीन धोरणाबाबत बेमुदत उपोषणाबाबत. | • तलावाची माती बांधावर टाकल्याबाबतचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच रेमंड रॉक करवाले यांच्या विरुध्द SDO वसई यांच्याकडे क्र.८/२०१७ रोजी गुन्हा दाखल केला आहे.<br>• सदर तक्रारीबाबत १६ तलाव निष्कासित केले आहे असे सांगितले. परंतु सदरची जागा Restore करण्यासाठी पुन्हा स्थळ पहाणी करुन अंदाजपत्र तयार करुन जागेचे रिस्टोशन करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | जिल्हाधिकारी पालघर<br><br>**अहवाल अप्राप्त** |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | **श्री.धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात. दि.** भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेलग्रुपने ( पॅन इंडिया) कट कारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२०.०२.२०१७ रोजी संयुक्त स्थळपाहणीनुसार सदर ठिकाणी ३ गुंठे जमिनीवरील कांदळवनाचा ऱ्हास झालेल्या ठिकाणी खार जमिनीवर कांदळवनाची पुन: लागवड केली असल्याचे दिसून येत आहे.<br>• या तक्रारी बाबत सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले नाही असे Lower Court मार्फत सदरची तक्रार बंद करण्यात आली आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतची पोलीसांमार्फत सदर ठिकाणी कांदळवनाचा नाश झालेला नाही असा असा अहवाल न्यायालात सादर करण्यात आला आहे त्याचे आदेश समितीपुढे सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>**अहवाल अप्राप्त** |
| ८ | **श्री. फ्रान्सिस डिसोजा:-** अध्यक्ष, हरीत नैसर्गिक वेभव बचाव अभियान, भुईंगाव ता. वसई<br>(**मौजे भुईगांव सर्वे क्र.** २२०) | • सदर जागेवरील Restoration ची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.<br>• समितीने या तक्रारी बाबत तक्रारदारा सोबत पुन्हा स्थळ पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन दि.१०.०२.२०२० पर्यंत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी पालघर<br>**अहवाल अप्राप्त** |
| ९ | श्री. स्टॅलिन डी दि.२०.०१.२०२०<br>Reclamation of Wetlands<br>left from Kharigaon toll plaza as one drives from Thane to Kalyan. | • सदर ठिकाणची जागा ही खार जमीन आहे तसेच तेथे कांदळवन देखील आहे तसेच तेथील पाण्याचे प्रवाह देखील बंद करण्यात आलेले आहे.<br>• तसेच सदर ठिकाणी भराव देखील करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार पर्यावरण विभागाकडे पाठविण्यास सांगितले व पर्यावरण विभागाने यातक्रारीबाबत सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | जिल्हाधिकारी ठाणे व पर्यावरण विभाग |

## नवीन प्राप्त तक्रारी

| अ.क्र | विषय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|
| १ | श्री. बी.एन. कुमार दि.22.01.2020<br>Dangerous burial of wetlands at Ghansoli, Navi Mumbai | जिल्हाधिकारी ठाणे आणि सिडको यांना सदरची तक्रार पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. |
| २ | श्री. सुनिल अगरवाल दि.24.02.2020<br>Debris dumping in TS Chanakya Wetlands | जिल्हाधिकारी ठाणे आणि सिडको यांना सदरची तक्रार पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. |